महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्र.केमाअ-२००५/प्र.क्र.१९६(भाग-२)/०५/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३.२.२००६

वाचा :- सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र.: केमाअ-२००५/प्र.क्र.१९६(भाग-२)/०५/५,दि.७.१०.२००५

शासन परिपत्रक :-

माहितीच्या अधिकारासंदर्भातील केंद्र शासनाचा "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५" दि.१२.१०.२००५ पासून अंमलात येत असल्याने माहितीच्या अधिकारासंदर्भातील एक समान कायदा संपूर्ण देशात लागू असणे आवश्यक असल्याने राज्य शासनाचा "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" निरसित करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता हा अधिनियम महाराष्ट्र अध्यादेश क्र.७/२००५, दि.५.१०.२००५ च्या अध्यादेशान्वये निरसित (Repeal) करण्यात आला असून सदर अध्यादेशाची प्रत दि.७.१०.२००५ च्या परिपत्रका सोबत सर्व संबंधितांना पाठविण्यात आली आहे.

२. सदर अध्यादेशाचे अधिनियमांत रूपांतर करण्याकरिता विधीमंडळाच्या सन २००५ च्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहापुढे मान्यतेकरिता सादर करण्यात आलेल्या विधेयकास दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाली असून त्याबाबतचा महाराष्ट्र माहितीचा अधिकार (निरसन) अधिनियम, २००५ दि.९ जानेवारी, २००६ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अधिनियमाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(सत्यबीर एस.डोड)
शासनाचे प्रधान सचिव

प्रत :-

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव,
*७) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
*९) महाप्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०) महाप्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) सर्व महानगरपालिका आयुक्त,
१७) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
१८) सर्व मंत्रालयीन विभाग, व सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१९) निवड नस्ती. (२ प्रती)

* (पत्राने)

D:\Sonawane\G.r.\87